63/1

WWW.VIIRJ.ORG

# VIDYABHARATI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Home
About Us
Editorial Board
Authors Guidelines
Submit Your Articles
Current Issue
Copyright Form
Conferences

Archieves:
June 2012
Dec 2012
June 2013
Dec 2013
June 2014
Dec 2014
June 2015
Dec 2015
June 2016
Dec 2016

VIIRJ VOL 6 Issue 1 ISSN 2319-4979 June 2017

CONTENTS

CROSS-CULTURAL PRAGMATICS: A STUDY OF APOLOGY SPEECH ACTS IN URDU LANGUAGE OF PAKISTAN [1-8]
M. A. Saif, M. Asif and M.S. Dogar

ASSESSING TOXIC THREAT OF COPPER CHLORIDE ON OVARY OF FISH, Clarias batrachus (Bloch) [9-12]
A.M. Avinashe

SCIENTIFIC MIRACLE OF THE HOLY QURAN REGARDING SECRETS OF CREATION OF MOUNTAINS [13-20]
Seyyed Mohammad Musavi-Moqaddam and Zohreh Baba-Ahmadi-Milani

THE IMPACT OF MACROECONOMIC DETERMINANTS ON KARACHI STOCK INDEX IN PAKISTAN: AN EMPIRICAL STUDY [21-30]
Muhammad Ashraf, Qadeer Ahmad andAhmad Nabeel Aslam Kahloon

ADVANTAGES AND DISADVANTAGES OF PROCEEDINGS COST IN COURTS [31-36]
A. Asgari and A. Khajehzadeh

THE TREND OF WESTERN HADITH STUDIES FROM THE BEGINNING TO THE PRESENT TIME FOCUSING ON IMAMIYYA HADITH [37-49]
Ali Hasannia, Ali Rad and Seyyad Mohammad Musavi Moqaddam

TEMPERATURE DEPENDENCE ELECTRICAL CONDUCTIVITY IN LITHIUM BORATE GLASSES DUE TO MIXED FORMER EFFECT [50-52]
D.T.Dongare , A.B. Lad, R.A. Patil and S.N.Patil

JEWISH SUFFERINGS IN BERNARD MALAMUD?S - THE FIXER AND MAN IN THE DRAWER [53-55]
K.S. Khandare

अरुण कोलटकरांच्या 'चिरीमिरी'या काव्यसंग्रहातील आशयसूत्रे [56-64]
वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव

कादंबरी एक साहित्यप्रकार [65-72]
गजानन अपिने

INVESTIGATING THE ROLE OFVERBAL PARALLELISM IN THE LANGUAGE OF ♦ASH-WEDNESDAY♦ BY T. S. ELIOT [72-80]
M. Saleem



>>>>

# अरुण कोलटकरांच्या 'चिरीमिरी'या काव्यसंग्रहातील मधील आशयसूत्रे

वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव
मॉडर्न महाविदयालय, पुणे

## प्रस्तावना

अरुण कोलटकरांच्या एकूणच संग्रहातील 'चिरीमिरी' हा दुसरा कवितासंग्रह जानेवारी 2003 मध्ये प्रकाशित झाला. 100 पृष्ठांच्या या संग्रहामध्ये एकूण 49 कवितांचा समावेश आहे. बळवंतबुवा आणि त्याच्याशी संबंधित वेगवेगळ्या हकीगती असे याचे प्रमुख सूत्र आहे. काही बाबतीत पहिल्या संग्रहातील कवितांची आशयसूत्रे आणि शैली ही चिरीमिरीमधील आशयसूत्रांच्या बाबतीत समान आहेत. परंतु यातील मुख्य आशयसूत्र हे पूर्णतः वेगळे आहे. बळवंतबुवा आणि त्याची वेश्यांसह पंढरपूरची वारी याच्याशी निगडित यातील कवितांची रचना झाली आहे. कोलटकरांनी बळवंतबुवा आणि त्यांच्याशी संबंधीत घटनांवर गद्यलेखनही केले आहे. पण ते पूर्णांशाने प्रसिद्ध झालेले नाही. त्यातील काही भाग प्रतिष्ठानच्या जाने.1993 च्या अरुण कोलटकर विशेषांकात प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहातील कविता वाचत असताना त्यामध्ये एक सुबोधता जाणवते. या संग्रहातील कवितांचा त्यामधील काही प्रमुख आशयसूत्रांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे विचार केला आहे.

1. महानगरीय संस्कृतीचे अधरूपतन
2. स्त्री–पुरुष संबंधातील गुंतागुंत
3. परंपारिक भक्तिमार्ग व ईश्वरविषयक संकल्पनेला छेद
4. अधोविश्वातील स्त्रियांचे जगणे
5. भक्तीच्या क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्तींचा उपरोध
6. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेला विठ्ठल हाच केंद्र

'चिरिमिरी' मधील कवितांना रूपावरच्या अभंगाने सुरूवात झालेली आहे. तुकारामाचे अभंग ज्याप्रमाणे चार पाच कवितांचा एक गट अशा रचनेत आहेत. त्याप्रमाणे चार पाच कवितांचा एक गट अशा रचनेत या संग्रहातील कवितांची मांडणी झाली आहे. यातील खूपशा कविता एकमेकांशी एकाच सूत्राने जोडलेल्या आहेत. पंढरपूरच्या यात्रेला निघालेल्या बळवंतबुवा आणि त्याच्यासोबतच्या 107 वेश्या असा प्रवास कथन करणाऱ्या काही कविता यामध्ये आहेत. रूपावरचा अभंग, निरोप, नगेली, ठेसन, लोळण फुगडी, तंबू, आंघोळ, नंदाचा वढा, टांगा, सगळ्याजणींच गाणं, भेट, फुगडी, विटेवरची फुगडी, फोटो, घोंगडी या कवितांचा यामध्ये समावेश होतो. काही कविता या प्रत्यक्ष विठ्ठल रखुमाईशी संवाद साधणाऱ्या आहेत. यामध्ये फुगडी, विटेवरची फुगडी, फोटा, ष्ठातिप्रणपा, वामांगी, प्रश्न यांचा समावेश होतो. बळवंतबुवा आणि त्यांच्याशी संबंधित विविध करामती त्यांच्याशी संबंधित काही कविता यामध्ये एकत्र येतात. यामध्ये कुलाब्याची फेरी, पॅट्रिक केलीच्या ऑफिसात झालेल्या एका प्रायोगिक मजनाचा पूर्वग्रह दूषित वृत्तांत, गा–हाणे, अनाजी फदालेस विनंती, टोमॅटो, आंबा या कवितांचा विचार करता येतो. तर काही ठिकाणी बुवांना कोंबडा, वाघ, घोडा या प्राण्यांच्याबद्दल स्वतःची जी निरीक्षणे सांगितली आहेत ती कवितांच्या माध्यमातून येताना दिसतात. यातील चातुवर्णव्यवस्थेवर हल्ला करणाऱ्या काही कविता आहेत. त्यामध्ये ष्ठातिप्रणपा, जोहार अशा कवितांचा समावेश होतो.

या संग्रहातील कविताही महानगराच्या पटावर आकार घेतात. पण महानगरातील संस्कृती कालमानाप्रमाणे होणारे तिचे अधःपतन यांनाही या कवितेमध्ये अधोरेखित केले आहे. एकूणच मानवी जीवनाची मूल्यधारणा त्याच्या नैतिक–अनैतिकतेच्या बदलणाऱ्या संकल्पना यांचेही दर्शन या संग्रहातून होते.

### 1) महानगरीय संस्कृतीचे अधरूपतन

औदयोगिकीकरणाच्या कालखंड हा संपूर्ण मानवी जीवनाला कलाटणी देणारा कालखंड होता. यातून निर्माण झालेल्या यंत्रसंस्कृतीने एका बाजूला जगण्याची नवी साधने निर्माण केलीच, पण परंपरागत व्यवसाय करणाऱ्या वर्गावर उपासमारीची वेळही आणली. दारिद्र्या, बेकारी, बकाल वस्त्या, त्यामध्ये पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिया, मजूर अशा संमिश्रतेसह महानगरे उदयाला आली. या

महानगरामधील विशिष्ट अशा महानगरीय संवेदनेचा आविष्कार कोलटकरांच्या पहिल्या संग्रहातूनही प्रत्ययाला येतोच.

परंतु या बदललेल्या जगाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेचे दर्शन 'चिरीमिरी' मधून घडते. बदलत्या काळाबरोबर माणूस ज्या ठिकाणी राहतो, तेथील त्याची सामाजिक रचनाही बदलत राहते. हा होणारा बदल तो स्वतःला मानवेल अशा पद्धतीनेच करून घेत असतो. 'चिरीमिरी' मधील बळवंतबुवा आणि त्याची एकशे सात वेश्यांसह पंढरपूरला वारी हे त्याचेच निदर्शक म्हणता येईल. ही वारी नेहमीच्या पंढरपूरच्या वारीपेक्षा वेगळी अशी आहे. त्यामुळे तिचा एका नव्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात विचार करावा लागतो.

नव्याने विकसित होऊ पाहणाऱ्या महानगरातील वेश्याव्यवसाय करणाऱ्या एका वर्गाकडे उपहासाच्या दृष्टिकोणातून पाहिले जाते. या वर्गाला नेहमीच खालच्या स्थानावर मानले जाते. अधोविश्वातील या स्त्रियांचा एक वर्ग,यांचे बुवांबरोबर विठ्ठलाच्या भेटीला जाणे ही बदलत असलेल्या सांस्कृतिक व्यवस्थेचेच निदर्शन करणारी एक घटना आहे. विठ्ठल हा महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक भिन्न भिन्न समूहाच्या लोकांचे आराध्यदैवत आहे. त्याच्या भेटीला कोणत्याही जातीचा, लिंगाचा, धर्म–पंथाचा भक्त उत्सुक असतो. परंपरागत वारी आणि वेश्यांसोबतची वारी यांची तुलना करून हळूहळू बदलत जाणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचे दर्शन ही कविता घडवत आहे. या वारीच्या माध्यमातून या लोकांच्या मानसिक अवस्थांमध्ये होत जाणारी अवस्थांतरेही तो सूचित करतो.

## 2) स्त्री–पुरुष संबंधातील गुंतागुंत :

कोलटकरांच्या एकूणच कवितेकडे पाहिले असता वेगवेगळ्या कालखंडात वावरणाऱ्या वेगवेगळ्या गटातील स्त्री–पुरुषांचे चित्रण त्यांनी अतिशय खुबीने केलेले दिसते. महानगरीय वास्तवाला तोंड देणारा, नैतिकतेचे स्वतःचे असे एक तत्त्वज्ञान मांडणारा बेधडक असा माणूस त्यांच्या पहिल्या संग्रहातून प्रत्ययाला येतो.

तर 'चिरीमिरी' मध्ये येणाऱ्या कविता या वेगवेगळ्या वृत्तीचे मिश्रण असलेल्या 'बळवंतबुवा' आणि त्यांच्या परिचयाच्या वेश्या यामधील नात्याचे उपरोधिक अंगाने चित्रण करणाऱ्या आहेत. हा बळवंतबुवा एक सामान्य व्यक्तीच आहे. त्याच्या लहानपणापासून म्हातारपणापर्यंतच्या वेगवेगळ्या हरकती कोलटकरांनी कवितेतून वाचकासमोर उघड केल्या आहेत. बळवंतबुवा आणि त्यांच्याशी संबंधित वेश्या यांना समोर ठेऊन ते स्त्री–पुरुष सबंधातील गुत्यांचे चित्रण करतात.

या ठिकाणी बळवंतबुवा वेगवेगळ्या भूमिकांमध्ये वाचकासमोर येतो. सुरूवातीलाच तो पंढरपूरच्या विठोबाला भेटण्यासाठी एकशे सात वेश्यांना घेऊन मुंबईहून रेल्वेने निघाला आहे. विठ्ठलाशी खास जिव्हाळ्याचे संबंध असलेला हा बळवंतबुवा स्वतःला 'भडवा' असे संबोधतो आहे. स्वतःच्या पारंपरिक व्यवसायाचा निर्देश तो यातून करतो आहे. एका विशिष्ट वर्तुळात बळवंतबुवाला प्रचंड मान आहे. कबीराच्या मठात वेश्यांसोबत उतरल्यावर त्यांची चांगली सेवा झाली पाहिजे. कारण ही माणसं विठ्ठलाच्या खास मर्जीतील आहेत असं तो म्हणतो. पण आपण आलेलो रख्खामाईला कळू न देण्याचाही त्याचा प्रयत्न आहे.

"कळता कामा नये
यातलं रख्माईला अक्षर
नाहीतर ती लष्कर
बोलवील बया."( पृ.क्र.11)

विठ्ठलाच्या मर्जीतला असूनही रख्खामाईला काहीच कळू न देणारा हा बळवंतबुवा वृत्तीने अतिशय हुशार आहे. येथे 'लष्कर' हा शब्द निवेदक उपरोधाने वापरतो. "साधारणतः अशा प्रकारची दलाली, मध्यस्थाची कामे करणारे लोक उच्चभ्रू वर्तुळातल्या पुरुषवर्गाशी संधान बांधून असतात. त्यांच्याशी संबंधित सर्व इतरजनांकडून स्वतःची व्यवस्थित सरबराई ते करून घेतात. मात्र त्याचवेळी ज्या लैंगिक व्यवहारातून ही माणसे बस्तान बसवतात तो व्यवहार गृहस्थाश्रमी विठ्ठलांच्या रख्खमाईपर्यंत जाऊ नये,आपली प्रतिष्ठा अबाधित रहावी यासाठी त्यांची धडपड असते. या सभ्यतेच्या बुरख्याआड चालणाऱ्या व्यवहाराचे वास्तव दर्शन या कवितांतून घडते." [1] 107 वेश्यांना घेऊन निघालेला बळवंतबुवा हा विठ्ठल रख्माईला भेटण्यासाठी निघाला आहे. पण सोबत 107 वेश्यांचा तांडा आहे आणि ही गोष्ट रख्माईला आवडणार नाही. याचे भान त्याला आहे. पारंपरिक पद्धतीने सरळमार्गी आयुष्य

जगणाऱ्या सामान्य स्त्रीच्या स्वभावाचे चित्रण रख्माईच्या माध्यमातून कोलटकर करतात. त्याचबरोबर स्वतःला भडवा म्हणवणाऱ्या, सभ्यतेचा मुखवटा घातलेल्या बळवंतबुवाच्या माध्यमातून भक्तीच्या क्षेत्रात शिरलेल्या दुष्ट प्रवृत्तींना पोसणाऱ्यांचे प्रातिनिधिक चित्रण त्यांनी केले आहे. एका बाजूला बळवंतबुवा आणि विठ्ठल आणि दुसऱ्या बाजूला रख्माई आणि वेश्या अशा भिन्न भिन्न स्तरातील स्त्री–पुरुषांमधील बदलत्या संदर्भाचे अतिशय उपरोधिक अंगाने चित्रण कोलटकर करतात. या सगळ्या वेश्या आणि बुवांसोबतची वारी यादरम्यानच्या बऱ्याच घटना या अशापद्धतीने दाखवता येतात. रेल्वेस्टेशनवर पोहचल्यावर रेल्वेच्या डब्याच्या दारात बुवा स्वतः उभे राहतात. वेश्यांव्यतिरिक्त या डब्यात इतर कुणालाही जागा नाही. कारण हा डबा स्त्रियांसाठी राखीव आहे. कोलटकरांनी अशा अनेक विसंगती साधून विनोद निर्माण केला आहे आणि त्यामुळे वास्तव अधिकच धारधार बनले आहे. बुवा हा अशाच इरसाल माणसांचा प्रतिनिधी आहे. रेल्वेच्या डब्यात सर्व जागा भरल्यावर अंबूला जागा मिळत नाही. तेव्हा तिची जागाही सूचकपणे तिला दाखवली जाते.

"सगळ्या सिटा भरल्या
तो बघ अंबू, तुझा नंबर
बुवाच्या मांडीवर
लिवलाय स्वच्छ"( पृ. 13)

याठिकाणी अभिधेबरोबर व्यंजनेने वेगळाच अर्थ प्रतीत होतो. कोणत्याही सामाजिक स्तरामध्ये वासनापूर्तीची केंद्रे ही दुय्यम समजली जातात. भक्तांसाठी मार्गदर्शक बनलेला बळवंतबुवा आणि त्याच्याबरोबर पंढरपूरला निघालेल्या वेश्या या त्याच्या वासनेला बळी पडलेल्या आहेत. या वासनापूर्तीसाठी सामाजिक, आर्थिकदृष्ट्या खालच्या वर्गातील स्त्रियांचेच शोषण केले जाते. त्यांच्या या परिस्थितीचा गैरफायदा कसा घेतला जातो. याचे प्रतिनिधिक चित्र त्यांच्या कवितेतून येते.

"मोती वारकऱ्यांची गर्दी
बघतोस काय घूस पुढं शिरप्या
बघ उभ्या आडव्या तिरप्या
किती बायका
उंच टाचा करून
मागे विटेदर उभा
कसा बघतोय बघा
विठ्ठल मेला" ( पृ. 15)

नेहमीच्या बोली भाषेचा वापर करत याठिकाणी विठ्ठलालाही सर्वसामान्य पातळीवर आणून त्याच्या मधील दडलेले वासनाविकार पृष्ठभूमीवर आणले आहेत. पंढरपूरच्या वाटेवर अंबू, सखू लोळणफुगडी खेळतात. तेव्हा अस्ताव्यस्त झालेल्या लुगड्याचाही त्यांना विसर पडतो. पण वासनेने भरलेल्या अनेक बुभुक्षित नजरा त्यांच्यावर खिळलेल्या आहेत. समोवतालच्या समूहाचे विचलित झालेले वासनाविकार अतिशय सूक्ष्मपणे याठिकाणी टिपले आहेत. पंढरपूरच्या वारीदरम्यान मोठमोठ्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उलाढाली घडत असतात. यामध्ये शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचाही फार मोठा समावेश असतो. परंतु वारीमधल्या या बाजूला नेहमीच अंधारात ठेवलेले दिसते. 'चिरीमिरी' मध्ये या वास्तवाचा समाचार घेतला आहे. वारीमधील या स्त्रिया अतिशय धाडसी आहेत. येईल त्या परिस्थितीला तोंड देण्याचं कौशल्यही त्यांच्यात आहे. वारीच्या वाटेवर असताना अंघोळीसाठी त्यांनी कुणा एका मोटवाल्याकडं पाणी मागितल्याचा जो प्रसंग आहे. त्यातून या घटनेची साक्ष पटते.

"अंबू किंवा तारा यांनी
म्हणावं हसूनशानी
दादा जरा आंघोळीला
पाणी देता का आमास्नी
यांनी असं विचारलं
साखरेच्या आवाजात
की नाही म्हणायची त्या
पठ्ठ्याची काय बिशाद"( पृ.क्र.17)

मोटवाल्याने त्यांना आंघोळीसाठी पाणी देणे, बुवानेही या दोघींच्याबरोबर आपली आंघोळ करणे आणि त्यामुळे मोटेचा बैल रागावणे ही पारंपरिक कामप्रेरणेची विविध रूपे आहेत असे म्हणावे लागेल.

### 3) पारंपरिक भक्तिमार्ग व ईश्वरविषयक संकल्पनेला छेद

'चिरीमिरी' मधील अनेक कविता या बळवंतबुवा त्यांची वेश्यांसोबतची वारी या सूत्राभोवती बांधलेल्या आहेत. बळवंतबुवा हा पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त. विठ्ठलाचा हा भक्त आणि त्याचं भाविकांशी असलेले नाते, विठ्ठलाशी

भक्त म्हणून त्याची असलेली जवळीक यातून बदललेली भारतीय आध्यात्मिक संस्कृती आणि त्यात ईश्वराचे नेमके कसे स्थान आहे हे उपहासात्मक पद्धतीने मांडले आहे. या अध्यात्माच्या क्षेत्रात शिरलेल्या वाईट प्रथा–परंपरामुळे परंपरागत भक्तीच्या ईश्वराच्या संकल्पनेला छेद मिळाला आहे. या भक्तीच्या वाटेत बळवंतबुवा सारखी माणसे जिथं–कुठे गरज लागेल तिथे विठ्ठलाचाच धाक दाखवतात.

उदा.

"विठू म्हणाला ठोक म्हणून इथं टोकला तंबू
व्हैवाटीचा हक्क तुमचा मला नका सांगू
उखडून बिघडून टाकलात तर हाणू डोसक्यात तोच बांबू
विठू सांगेल तसं चालू सांगेल तसं तिथं थांबू
त्यानं परमिट दिलं म्हणून इथं मांडल पाल
देखने को दाम नही पण हात लावाल तर पस्तवाल
पंढरपूरला जातोय सगळा विठूसाठी घेऊन माल
विठोबाचा भडवा झाला बळवंतबुवा मस्तवाल"

( पृ.क्र.16)

विठ्ठलाच्या दर्शनासाठी बळवंतबुवाबरोबर ज्या स्त्रिया जातात त्यांना थांबण्यासाठी विठ्ठलानंच 'परमिट' दिलेल आहे. कारण हा सगळा 'माल' बळवंतबुवा विठ्ठलासाठीच घेऊन निघाला आहे. ईश्वराच्या नावावर वेगवेगळ्या गोष्टींवर आपला हक्क गाजविणाऱ्या मानसिकतेच्या लोकांचे दर्शन यातून होते. विठ्ठलाला सर्वसामान्य पुरुषवर्गाचा प्रतिनिधी कल्पून या स्त्रिया त्यांच्याशी वेगवेगळ्या रीतीने संवाद साधतात. हेही याठिकाणी नमूद करावे लागेल. 'टांगा' या सारख्या कवितेतून अंबुताई आता चालणं जमत नाही. त्यामुळं विठ्ठलाला गाऱ्हाणं घालते.

"दरवर्षी हेच चाललंय
आम्ही घालतोय खेपा
आता येऊन पाच खेपा
पांडुरंगा"( पृ.क्र.21)

पांडुरंगाला आपल्या मनातलं सगळं सांगणाऱ्या या स्त्रियांना त्याच्या दैवी शक्तीपेक्षा त्याच्या अद्‌भुत रूपापेक्षा त्याच सर्वसामान्यरूप जास्त भावताना दिसतं. या स्त्रिया प्रसंगी विठ्ठलाशी खेळतात. आणि विठ्ठलाला फोटोच्या दोन कॉपी फुकट देण्याचा वायदाही करतात. फुगडी घालताना स्वतःला धडधाकट म्हणवणारी अंबू म्हणते.

"पितांबराला पुसून घे निसटेल हात पकड घट"( पृ.क्र.24)

विठ्ठल हा याठिकाणी सर्वसामान्य पुरुषसत्ताक व्यवस्थेचाच एक महत्त्वाचा प्रतिनिधी आहे. माणसाच्या कामवासना, लंपटवृत्ती, विकारवशता ही त्याच्यासुद्धा ठिकाणी आहे असे याठिकाणी कल्पिले आहे. भक्तीच्या नावाखाली सर्वसामान्याला लुबाडणारी प्रवृत्ती, स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या दुष्ट वृत्ती आणि यातून मग माणसाची ईश्वराबद्दलची बदलणारी प्रतिमा या साऱ्यांचा वेध याठिकाणी घेतला आहे.

### 4) अधोविश्वातील स्त्रियांच्या जगण्याचे चित्रण

वेगवेगळ्या कालखंडात समाजातील स्त्रियांचे स्थान बदलणारे असते. विविध साहित्यप्रकारामध्ये याची चर्चा होत असते. 'चिरीमिरी'त येणाऱ्या स्त्रिया या अतिशय वैशिष्ट्यापूर्ण आहेत. त्यांचे स्वभाव अतिशय भिन्न तर आहेतच. पण आर्थिक आणि सामाजिक स्तरही वेगवेगळे आहेत. एकाचवेळी उच्च सामाजिक स्तर लाभलेली दैवी गुण असलेली रख्माई, घरंदाज घराण्यातील गीताबाई तर दुसरीकडे अधोविश्वातील शरीरविक्रय करणारी स्त्री, अशा तीन स्तरातल्या स्त्रियांचे विश्व वेगवेगळ्या प्रसंगामधून रेखाटले आहे.

'वामांगी' या कवितेमध्ये विठ्ठलाच्या भेटीला गेलेला भक्त रख्माईला शेजारी विठ्ठल नाही हे सांगतो. तेव्हा तिनं दिलेलं उत्तर हे समस्त स्त्रीवर्गाच्या मानसिकतेचं प्रतिनिधित्व करतो.

"कधी येतो कधी जातो
कुठ जातो काय करतो
मला काही काही
माहिती नाही.
खांद्याला खांदा भिडवून
नेहमी बाजूला असेल विठू
म्हणून मी पण बावळट
उभी राहले" ( पृ.क्र.37)

पुरुषवर्गाच्या व्यवहारातील, त्यांच्या वागण्यातील अनेक गोष्टी स्त्रियांना माहीत नसतात. रख्माईही त्यांच्यापैकी एक आहे. माझं सगळं आयुष्य नाकासमोर बघण्यात गेलं असं ती म्हणते. विठू शेजारी नसल्यामुळे रख्माईच्या

मनात एक पोकळी निर्माण झालीय. तिलाही 'अठ्ठावीस युगांच एकटेपण' भेटायला आलयं असं वाटतं. या रखमाईला भक्त लोक मात्र घाबरून आहेत. एकशे सात वेश्यांना घेऊन येणारा बुवा ही गोष्ट रखमाईला कळू नये म्हणून प्रयत्न करतो.

"कळता कामा नये
यातलं रखमाईला अक्षर
नाहीतर ती लष्कर
बोलवील बया"( पृ.क्र.11)

अशी भीतीही तो बाळगून आहे.येथे 'लष्कर' हा शब्द उपरोधिक अंगाने निवेदक वापरतो. स्त्रियांच्यामधील एकमेकांबद्दलच्या वाटणाऱ्या मत्सराचे दर्शनही इथे घडते. विठ्ठलासोबत फोटो काढताना या स्त्रियांपैकी एकजण रखमाईला जरा सरकायला सांगते आणि विठ्ठलाला आपल्या खांद्यावर हात ठेवायला सांगते. ही गोष्ट रखमाईला आवडत नाही. तेव्हा रखमाईला ती म्हणते.

"का गं रखमाई तुला का गं आला राग
मुंबईला जाताना देईन परत विठ्ठल
तुझा तुला गं"( पृ.क्र.26)

या स्त्रियांचे विठ्ठलाप्रती असलेले प्रेम, त्याबद्दलची रखमाईची भावना यांचे सूक्ष्म चित्रण येथे केले आहे. या रखमाईप्रमाणेच गीताबाई ही सुद्धा एक घरंदाज बाई आहे. प्रथमदर्शनी तिचा नवरा कोण हे नेमकेपणाने सांगता येत नसले तरी तिने वर्णन केलेल्या गुणांकडे बघता बळवंतबुवा सारखा इरसाल गडीच तिचा नवरा असावा असे वाटते. 'गीताबाईचे अभंग' या शीर्षकाखाली हा बारा कवितांचा संच आहे. गीताबाई आपल्या नवऱ्याच्या तऱ्हेवाईकपणाची तक्रार करते आहे. एकट्या नवऱ्यानेच सासू, सासरा, नणंद याचे नाटक उभे केले आहे. असे उपरोधाने म्हणते आहे. सर्व प्राण्यांचे गुण या एकट्या नवऱ्याच्या अंगी एकवटले आहेत. त्याच्या विक्षिप्तपणाला सीमा नाही. त्यामुळे स्वतःला ती 'बागेची राणी' म्हणवते आहे. विठ्ठलाला या सगळ्या तक्रारी सांगण्यात तर बुवामंडळींनी विठ्ठलाला घेरलं आहे. त्यामुळे चांगल्या वाईट गुणांच्या आपल्या नवऱ्याला ती विठ्ठलाच्या स्वाधीन करते. याठिकाणी जनाबाईच्या एका अभंगाची आठवण होते. जनाबाईही विठ्ठलाला असेच साकडे घालते आहे.

"आम्ही पातकाच्या राशी। आलो तुझ्या पायापाशी।। 1।।
मनी येईल ते तू करी। आता तारी अथवा मारी
जनी म्हणणे सृष्टीवरी। एक अससी तू बा हरी ।।"

(जनाबाईचे अभंग, पृ. 135)

या सर्वच लोकांचा तारणहार तो विठ्ठल आहे. आणि हा माणूस म्हणजे अनेक पापे करणारा पातकांच्या राशी आहे. त्याच्यावर दया दाखवायची की, त्याला माफ करायचे हे सारे विठ्ठलाच्या हाती आहे. याठिकाणी गीताबाईही विठ्ठलाला म्हणते,

"तुझ्यापुढं देवा ओतला नवरा
भला आणि बुरा आहे तसा
बऱ्याबाईटची एकत्र ही रास
निवडीत बैस तूच आता"( पृ. 89)

गीताबाईने आपल्या नवऱ्याला सरळ करण्याची जबाबदारी विठ्ठलावर सोपवली आहे. आपला नवरा म्हणजे अठरा धान्यांचे कडबोळे असून तूच सरळ कर असे ती विठ्ठलाला विनवते.

या संग्रहातील आणखी एका वर्गातील स्त्रियांच्या भावविश्वाचे दर्शन वाचकाला घडते. या स्त्रिया वेश्याव्यवसाय करणाऱ्या आहेत. या स्त्रिया पंढरपूरचा विठ्ठल आणि बळवंतबुवा यांच्याशी त्यांच्या होणाऱ्या संवादातून त्यांच्या स्वभावाच्या वेगवेगळ्या छटा लक्षात येतात. विठ्ठलाप्रती त्यांना अतिशय जिव्हाळा आहे. त्याला भेटायला जाताना एक 'नगेली' एवढं मोठं स्टेशन पाहून घाबरते आणि त्यालाच विनवते.

"जमल्यास तूच ये ना केव्हातरी
तुझी वाट पाहीन मी माझ्या घरी"( पृ.क्र.12)

त्या विठ्ठलाला अतिशय लडिवाळपणे आपल्याकडे येण्यासाठी हट्ट करतात. तर कधी त्याच्या न येण्याने त्याला दूषणेही देतात.

"आम्ही चालून यायचे
पन्नास पंच्यातर कोस
तू मात्र हलू नकोस
जागचा अगदी
पायाखाली ईट घेऊन
तू नुसता उभा ऱ्हा
आरं ही कोण गावची तऱ्हा
ये सामोरा"( पृ.क्र.20)

विठ्ठलाच्या विटेवर उभे असण्यालाच त्यांनी प्रश्न केला आहे. या स्त्रिया त्याच्याशी कधी

हुज्जत घालताहेत तर कधी नम्रपणे त्याला विनवणी करताहेत.

'चिरीमिरी' मधील कविता वाचत असताना खूपदा जनाबाईच्या अभंगाची आठवण येते. जनाबाईचे विठ्ठलाप्रती असलेले प्रेम, तिची करुणा अतिशय तीव्रतेने तिच्या अभंगातून व्यक्त होताना दिसते. विठ्ठलाला भेटण्याची उत्कटता हे तिच्या अभंगाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. जनाबाई ही शूद्राच्या घरी जन्माला आलेली होती. तरीही 'स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास' अशी स्वतःची समजूत ती घालते. आपण शूद्र स्त्री आहोत. त्यामुळे परमार्थमार्गावर आपण वाटचाल करावी की नाही असा संभ्रम जनाबाईच्या मनात आलेला नाही. 'चिरीमिरी' मधील या स्त्रियाही शूद्र आहेत, शरीरविक्रयाचा व्यवसाय त्या करतात. पण विठ्ठलाप्रती त्यांची भक्तीही तितकीच उत्कट आहे. जनाबाईप्रमाणेच त्यांना दुःख होत आहे. ते विठ्ठलाला भेटण्यासाठी उशीर होत आहे याचं. जनाबाई परमेश्वराच्या भेटीसाठी व्याकुळ आहे. जेव्हा या भेटीमध्ये काळाचे खूप अंतर पडते आहे असे वाटते तेव्हा ती देवाला 'तू का निष्ठूर झाला आहेस? असे कळवळून विचारते. 'चिरीमिरी' मधील अंबूताईही विठ्ठलभेटीसाठी निघते. पण एवढा दूरचा प्रवास तिला झेपत नाही. ती म्हणते आम्ही पन्नास पंच्यात्तर कोस चालून आमच्या पायाला फोड आले. आता विठोबानेच एक टांगा आणून द्यावा.

या स्त्रियांना विठ्ठलापर्यंत पोहचवणारा 'बळवंतबुवा', या स्त्रियांना त्यांच्या अडीअडचणीला मदत करतो आहे. त्यामुळे त्याच्याविषयी यांना खूप आदर वाटतो आहे. बबू नावाची वेश्या मेल्यावर तिच्या अस्थी न मिळाल्याने तिचा फोटो बुवा इंद्रायणीत नेऊन विसर्जित करतो. तर कोणा एक वेश्येला तिच्याकडे गिऱ्हाईक येत नाही म्हणून कोहळा मंतरून देतो.

'चिरीमिरी' मधील अनेक कविता या स्त्रीजीवनाच्या व्यथा, त्याचे शूद्रपण स्पष्ट करणाऱ्या आहेत. वेगवेगळ्या रूपकांमधून, प्रतिमा–प्रतीकांच्या माध्यमातून स्त्रियांचे दडपलेपण येथे सूचित केले आहे. या साऱ्या गुंतागुंतीच्या जगण्यात प्रत्येकाला विठ्ठलच जवळचा वाटतो आहे. यापूर्वी संतांनीही जेव्हा जेव्हा संकट येईल तेव्हा तेव्हा पंढरपूरच्या विठ्ठलालाच साकडे घातले. आधुनिक काळातही जेव्हा जेव्हा असुरक्षिततेची भावना निर्माण झाली त्यावेळी आपल्या आदिम श्रद्धास्थानाकडे आधुनिक माणसाने धाव घेतलेली दिसते. "विशेषतः मराठी संतकवितेतील जनाबाईशी नाते सांगणाऱ्या रचनांमधील 'विरोधाभक्ती' चा आधुनिक अवतार वाटणाऱ्या कवितांमध्येही पारंपरिक भक्तिकल्पनेशी बद्ध असलेल्या ईश्वर प्रतिमेला पुरुषसत्ताक व्यवस्थेचा प्रतिनिधी मानून त्यांची लंपटवृत्ती विकारवशता, अबोध मनातील कामप्रेरणा, लोचटपणा इ. अंबूसारख्या वेश्येच्या तोंडून टर उडवली आहे."[2] ईश्वरावर त्यांचे असलेले प्रेम, त्याच्याशी प्रसंगी केलेले भांडण या साऱ्यातून भक्तीचे त्यांचे स्वतःचे एकजीव रसायन तयार झालेले दिसून येते.

### 5. भक्तीच्या क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्तींचा उपरोध३

'चिरीमिरी' मध्ये जे मुख्य पात्र आहे ते म्हणजे बळवंतबुवा. या बळवंतबुवाचे वेगवेगळे किस्से कोलटकरांनी कवितेमधून सांगितले आहेत.

बुवांचा कवितेतला प्रवास अगदी लहानपणापासून चालू झाला आहे. कुलाब्याला बापाबरोबर फळ विकण्याचा त्याचा उद्योग आहे. पोरवयातील बळवंतही अतिशय धूर्त आहे. एकदा मिल्ट्री एरियात बळवंताच्या टोपलीतील हापूस आंबे 'गोरे सोजीर' पैसे न देताच घेऊन जातात. एका वकीलाकडून मिल्ट्री साहेबाकडे ते याची तक्रार करतात. साहेब त्या गोऱ्या सोजीरांना बळवंतसमोर उभे करतो. त्याला ते सगळेच गोरे लोक एकसारखे दिसतात. तरीही तो त्यातले अंदाजे पाचजण निवडतो आणि ठामपणे 'ते' हेच असे सांगतो आणि त्याबरोबरच स्वतःचे असे एक तत्त्वज्ञानही सांगतो.

"सगळेच जग खोटे पहा करून विचार
तिथं खरे चोर मी तरी कुठून आणणार"( पृ.क्र. 41)

बालपणापासून चतुर असणारा हा बळवंतबुवा अतिशय करामती आहे. मडमेच्या झग्यात घुसण्याची गोष्ट असो किंवा अनाजी फदालेच्या बायकोला तो घाबरण्याची गोष्ट असो यातून सही सलामत बाहेर पडण्याची कलाही त्याच्या अंगी आहे. अनाजी फदालेच्या घरी भाजी द्यायला गेलेला बळवंत त्यांच्या बायकोच्या लगटपणाला टरकून आहे. तसे तो अनाजीला

सांगतोही अगदी एखाद्या 'रांडेकडे' तुझी माळ विसरली तरी मी आणून देईन. पण तुझ्या घरी पाठवू नको असे तो म्हणतो आणि याचे समर्थन करताना तो म्हणतो,

"मागाहून नको करून तकरार
बळवंत्या नाही तसा कामचुकार"( पृ. 50)

इथे 'काम' हा शब्द अभिधा आणि व्यंजनेने समर्पकरीत्या वापरला आहे. पुढे केळी साहेबांच्या समोर जे भजन झाले त्याचा वृत्तांत सांगणारा बळवंतबुवा मात्र मोठा आहे. बुवांची प्रत्येक निरीक्षणं ही अतिशय वेगळी आहेत. विशेषतः त्यांनी भाज्यांबद्दल जी निरीक्षणं मांडली आहेत ती नोंद घेण्यासारखी आहेत. 'टोमॅटो' सारख्या भाजीत सुटी नाणी लपवता येतात, त्यामुळे टोमॅटो बुवांचा लाडका आणि शेवटी टोमॅटोचही बुवा काय करतो हे पाहण्यासारखं आहे.

"बळवंत्या देतो फेकून टोमॅटो
खिशात घालतो अर्थ त्याचा"( पृ. 53)

ढबू मिरचीत नाण्यांचा आवाज होतो. घेवडा, मटारमध्ये नाणी बसत नाहीत. मेथी, राजगिरा, पालक, पोकळा या पालेभाज्यांमध्ये तर नाणी ठेवताच येत नाहीत. त्यामुळे बुवाला या भाज्यांचा स्वभाव मोकळा वाटतो. आंब्यांमध्ये ठेवलेल्या अधेल्या, पावल्या त्यांच्याकडे आलेल्या पठाणाने तोच आंबा घेतल्याने गेल्या. त्यामुळे बुवा प्रत्येकाला आंब्यात पैसं गुंतवू नका असा सल्ला देतो.

बुवा पंढरपूरला वेश्यांना घेऊन वारीला जातो. तेव्हा तिथेही विठ्ठलाचा भडवा म्हणून वावरतो आहे. स्वतःला हवं तिथं तो तंबू ठोकतो आहे. रेल्वेस्टेशनवरच्या गार्डला वेश्यासहित एकशे आठ कप चहा मागवायला सांगतो आहे. बळवंतबुवा चतुर कराभती आहेच, पण त्याच्या हळव्या वृत्तीचे दर्शनही काही कवितातून घडते. बुवाचा वेश्यांना खूप मोठा आधार आहे. एखादया वेश्येकडे गिऱ्हाईक जात नाही. तेव्हा तिला तो एखादा मंत्र देतो. पण त्याबद्दल पैसे घेत नाही. तिच काम झालं तर केवळ अर्धा कप चहा एवढीच त्याची मागणी आहे. एखादीचा धंदा झाला नाही तर बुवाच एखादा रुपया तिला देतो आहे. तर दुसरीला धंदा चांगला चालावा म्हणून कोहळा मंतरून देतो आहे. या बायकांना बुवाशिवाय कुणाचाच आधार नाही. अगदी मेल्यावरही यांच्यापैकी बबूचा फोटो बुवाच इंद्रायणीत विसर्जित करतो. या स्त्रियांबरोबरच्या प्रवासात बुवाच्या स्वभावातील वेगवेगळ्या गोष्टींवरून त्याच्या इरसालपणा लक्षात येतो. बुवानं याठिकाणी कोंबडा, वाघ, घोडा याबद्दलही वेगवेगळी निरीक्षणे मांडली आहेत.

"वेळच्यावेळी जो लायनीबाहेर
पडला तो शेर
समजावा"( पृ. 60)

जगरहाटीचे नियम, माणसाचा स्वभाव, त्यामधील विसंगती हे सारं कोलटकर बळवंतबुवाच्या माध्यमातून अतिशय बेमालूमपणे मांडतात. बळवंतबुवाचा प्रवास हा स्वातंत्र्यपूर्वकालखंडापासून ते स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतरच्या काळात चालू आहे. त्यामुळे काळानुसार बुवाच्या बदलत जाणाऱ्या स्वभावाचे दर्शनही येथे मार्मिकपणे घडवलेले आहे.

## 6) महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेला विठ्ठल हाच केंद्र

कोलटकरांच्या पहिल्या संग्रहातील कवितांची मुळे ही मराठी काव्य परंपरेप्रमाणेच युरोपीय काव्यपरंपरेतही सापडतात. पण या संग्रहातील कविता या पूर्णतः मराठी लोकसंस्कृतीशी आपली नाळ जोडताना दिसतात. लोकसंस्कृतीतला विठ्ठल, वारकरी, भक्तगण यांच्या आधारे कोलटकरांची कविता स्वतःचे असे वेगळे कथानक निर्माण करते.

उदा. 'छातिप्रणपा' या कवितेतून त्यांनी विठ्ठलाच्या भेटीला महाराची लेकरे भेटीला येणार हे कळल्यावर विठ्ठलाला कापरे भरते असे कथानक कल्पून पुढे त्या घटनेचा विस्तार केला आहे. या कथानकाची मुळेही आपल्याला संताच्या अभंगात सापडतात. पण त्याचे विडंबन याठिकाणी कोलटकर करतात. चोखामेळा विठ्ठलाला भेटायला जातो. त्याचे वर्णन जनाबाईने आपल्या अभंगातुन केले आहे.

"यातिहीन चोखामेळा। त्यासी भक्तांचा कळवळा ।। 1।।

त्याचा जाला म्हणीयारा । राहे घरी घरी थारा ।। 2।।

देव बाटविला त्याने । हांसे जनी गाय गाणे ।। 3।।

चोखामेळा संत भला । तेणे देव भुलवीला

भक्ति आहे ज्याची मोठी । त्याला पावतो संकटी ।। 2।।

चोखामेळ्याची करणी। तेणे देव केला ऋणी

लागा विठ्ठल चरणी । म्हणे नामयाची जनी ।। 3।।

(जनाबाईचे अभंग, पृ. 133)

चोखामेळा आणि त्याचा परिवार विठ्ठलाला भेटायला जातात. त्याने देव बाटवला असे जनाबाई म्हणते. या मनोभूमीतून कोलटकर मात्र आधुनिक काळात त्याचे विडंबन करतात.

उदा. "उघडले महाद्वार
आत येतील की महार
येणार चोखामेळ्याची लेकरे
भरले विठ्ठलाला कापरे"
(पृ. 31)

विठ्ठलाभोवती असलेले बडवे, परंपराग्रस्त समाज या सर्वांनी चोखामेळ्याच्या लेकरांना अस्पृश्यतेची वागणूक दिली आणि आता विठ्ठलालाही ही लेकरे आपल्याला भेटायला येणार म्हणून कापरे भरले आहे.याठिकाणी विठ्ठलाचे कापरे उपरोधाने उपरोधाने अधोरेखित केले आहे.

इथल्या समाजातील जातिव्यवस्थेची मुळे किती खोलपर्यंत गेली आहेत. याचे प्रत्यंतर या कवितातून येते. या जातिव्यवस्थेवर तेथील अस्पृश्यतेच्या प्रश्नावर प्रहार करणाऱ्या 'जोहार' या कवितेमूधनही कोलटकर चातुवर्ण्य पद्धतीला उपहासाने गाढवाची उपमा देतात. "चातुवर्ण्याच्या गाढवातून निर्माण झालेल्या अस्पृश्यतेमुळे आणि वरील 'निरोप' कवितेतील 'तसल्या' विठ्ठलाचे चोखामेळ्याच्या लेकरांबरोबरचे जे विपरीत वागणे आहे. त्याचे उपहास उपरोधयुक्त चित्र प्रस्तुत कवितेत रेखाटले आहे."[3]

'चिरीमिरी' मधून अनेक जी छोटी उपकथानके येतात त्यातून वेगवेगळ्या मनुष्यस्वभावाचे सखोल दर्शन घडते. त्यामुळे कोलटकरांचा हा दुसरा काव्यसंग्रह आशय आणि अभिव्यक्तीबाबतीत महत्त्वाचा वाटतो.

## समारोप

कोलटकरांचा हा 'चिरीमिरी' मधला सगळा आशय अतिशय सुबोधपणे वाचकापर्यंत येतो. प्रसंगी उपहासाने,उपरोधिकतेने ते समाजातील पाखंडी वृत्तीवर प्रहार करतात. अधोविश्वातील स्त्रियांचे जगणे, पारंपरिक भक्तिमार्ग लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेला विठ्ठल, कुलाब्यापासून चालू झालेला बळवंतबुवाचा प्रवास आणि शेवटी म्हातारपणी यमाबरोबर न जाण्यासाठी त्याला 'चिरीमिरी' देण्याचा प्रसंग अशा विविध प्रसंगांमधून कोलटकर माणूस त्याच्या विविध वृत्तिप्रवृत्ती यांना अधोरेखित करतात. कोलटकरांच्या पहिल्या संग्रहातील कवितांचे वाचन करताना विशिष्ट असे संकेतव्यूह वाचकाला माहीत असणे आवश्यक होते आणि ते बऱ्याचदा माहीत नसल्याने या कवितांची दुर्बोध अशी प्रतिमा त्याच्या मनात तयार झाली ती मात्र या कवितांनी पुसली गेली. "मुख्य म्हणजे लोकमानसाला जवळच्या वाटणाऱ्या पारंपारिक लयी, छंद, अभंग तसेच स्त्रीजीवनाचे चित्रण, कामप्रेरणांची विविध रूपे, पुरूषी ढोंगीपणा, लबाडी, बाहेरख्यालीपणा यासारखी आशयसूत्रे व आकलनसुलभता यामुळे ही कविता सर्वसामान्य वाचकाला आपल्यापर्यंत खेचून आणण्यात यशस्वी ठरली आहे. हे तिचे मोठेच वैशिष्ट्या म्हणवे लागेल."[4]

'चिरीमिरी' मधील कविता या कोलटकरांच्या दुसऱ्या टप्प्यातील कविता आहेत. साहजिकच या कवीच्या कवितेचा विकास हा दुर्बोधतेकडून सरलतेकडे होतो आहे, असे म्हणणे या संदर्भात अधिक सयुक्तिक वाटते. आशयाची मांडणी ・शब्दयोजना यामध्येही याठिकाणी सरलता आलेली दिसून येते. आधुनिक जीवनाने माणसाच्या परंपरेतील गोष्टींचे नेमके काय केले याचे उदाहरण म्हणून 'चिरीमिरी' कडे बघता येईल. याठिकाणी आधुनिक महानगरीय संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर हा सगळा भक्तिप्रपंच चालला आहे. पण पारंपरिक भक्तीच्या संकल्पनांच्या पलीकडे जाऊन एक वेगळीच व्यवस्था इथे आकाराला आली आहे. कोलटकर या सगळ्या व्यवस्थेचे एक चित्र आपल्यासमोर काढून ठेवतात. ती चांगली की वाईट, जुन्याच्या तुलनेत त्याचं कितपत महत्त्व आहे या सगळ्याचा ऊहापोह ती करत नाही. हे सगळं ती वाचकावर सोपवते. 'चिरीमिरी' या शीर्षकापासून माणसातील त्याच्या स्वभावातील रिकाम्या जागांचा, पोकळपणाचा समाचार कोलटकर घेतात. मानवी स्वभावाच्या सूक्ष्म अशा छटा, त्याचे अंतरंग त्यांच्या कवितांद्वारे लक्षात येते.

## संदर्भ

1) बांदेकर, प्रवीण 'अरुण कोलटकरच्या कविता आणि चिरीमिरी.: काही निरीक्षणे', अभिधानंतर अरुण कोलटकर विशेषांक,जाने–जून 2004, पृ. 49.

2) तत्रैव,पृ.50.

3)पाटील एम.पी.'अरुण कोलटकरांची ष्ठातिप्रणपा' , नवअनुष्टुभ, ;संपा. एकनाथ पगार द्व मार्च – एप्रिल 2006 अंक 2, वर्ष 3 पृ.43.

4)बांदेकर प्रवीण, उ. नि.पृ.50